**परिपत्रक क्रमांक 251**

**विषय :- 1951 चे अधिनियमाचे नियम 32 (2) प्रमाणे हरकतीची जादा भरलेली अंशदान रककम परत करणेबाबत ...**

धर्मादाय संघटनेच्या सर्व विभागीय व उप विभागीय कार्यालयांना कळविणेत येते की, 1951 च्या मुंबई सार्वजनिक विश्‍वस्त व्यवस्था नियमांच्या नियम 33 (2) खालील हरकतीच्या प्रकरणांतील अंशदानाची जादा झालेली रक्कम उप व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे आदेशान्वये परत करणेस परवानगी देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आला असता, तयाबाबत शासनाकडून विधी व न्याय विभाग, पत्र क्रमांक बीपीटी.1184/61/(128) सहा, दिनांक 12 ऑगस्ट, 1985 नुसार असे आदेश झाले आहेत की, मुंबई सार्वजनिक विश्‍वस्त व्यवस्था नियम, 1951 मधील नियम 32 (6-ब) प्रमाणे जर चालू वर्षाकरीता न्यासाने (ट्रस्ट) भरलेल्या अंशदानाची रक्कम न्यासाने (ट्रस्ट) देय असलेल्या रकमेपेक्षा जास्त असेल, तर जादा जमा झालेली रक्कम परत करावयाची नाही. तर अशी जादा रक्कम पुढील वर्षाच्या अंशदानाच्या रकमेत ती हिशेबात घ्यावयाची असते.

त्याप्रमाणे शासनाने असेही कळविले आहे की, धर्मादाय उप आयुक्त व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांना सदर रक्कम परत करण्याचा अधिकार नाही आणि वर उल्लेख केलेल्या नियमाप्रमाणे अशी जास्त भरलेली रक्कम परत करणे मुंबई विश्‍वस्त व्यवस्था अधिनियमाच्या कलम 60 प्रमाणे आणि वरील नियमाच्या नियम 32 (6-ब) प्रमाणे अभिप्रेत नाही. अशी जादा रककम रोखीने परत करणे सर्वथैव बेकायदेशीर आहे. तेव्हा अशी रककम परत करण्याची परवानगी देणे नियम 32 (6-ब) शी विसंगत असलयामुळे अशी परवानगी देता येणार नाही, तेव्हा अशी जादा जमा झालेली रक्कम परत करणे ताबडतोब बंद करावे.

अ.शं.मेढेकर,<br>
धर्मादाय आयुक्त,<br>
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दिनांक 28 ऑगस्ट, 1985.